३४१

**कार्यालय भूमि संपादन विशेष अधिकारी,**
**विशेष घटक, सोलापूर.**

डॉ.कोटणीस हॉल, पहिला मजला, पार्क चौक, सोलापूर, ४१३००१.
दु.क्र.०२१७-२७२३५४८.                                    slaosusol@gmail.com

---

जा.क्र.भूसंविअ/विघ-सो/,एस.आर.६/२०१६/बार्शी/ ३९२                                    दि:२७/०६/२०१८.

प्रति,

मा. जिल्हा विज्ञान व सूचना अधिकारी
(एन.आय.सी) सोलापूर

विषय :- भूसंपादन-बार्शी(एस.आर.६/२०१६)
बार्शी नगरपरिषदेच्या मंजूर विकास योजनेतील (दु.सु.) आरक्षण क्र.आ.क्र.३४, "बगीचा" या सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादनाच्या अनुषंगाने नोटीसीचे प्रसिध्दीकरण करणेबाबत.

महोदय,

बार्शी नगरपरिषदेच्या मंजूर विकास योजनेतील (दु.सु.) आ.क्र.३४, "बगीचा" या सार्वजनिक प्रयोजनासाठी भूसंपादन करणेबाबत बार्शी नगरपरिषदेचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या संदर्भाधिन आदेशाव्दारे या कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे.

विषयांकित भूसंपादन प्रकरणी भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील तरतुदी नुसार कलम २१ (१) (४) अन्वयेच्या नोटीसीचे कलम २१ (५) अन्वये उक्त अधिनियमातील तरतुदी नुसार सोलापूर जिल्हयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे आवश्यक असल्याने आहे. सदर प्रसिध्दीकरणाची प्रत सोबत प्रसिध्दीसाठी सादर करीत आहे. सदरची जाहीर नोटीस कृपया त्वरीत अपलोड करुन प्रसिध्द करण्यात यावी ही विनंती आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

आपला

Mandwale. M.D

( मो.बा.मंडवाले )
भूमि संपादन विशेष अधिकारी,
विशेष घटक,सोलापूर.

प्रत - मा. जिल्हाधिकारी (भूसंपाादन शाखा)सोलापूर यांना माहितीस्तव सादर

# भूमि संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक, सोलापूर यांजकडून जाहीर नोटीस

## भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३,चे कलम २१ (१)(४) अन्वये नोटीस

---

ज्या अर्थी बार्शी नगरपालिकेच्या मंजूर दुसरी सुधारित विकास योजना मधील, आ.क्र.३४, " बगीचा" या प्रयोजनासाठी जागा संपादनाची कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ सह भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३(यापुढे उक्त अधिनियम म्हणून संबोधिलेला) नुसार भूमि संपादन विशेष अधिकारी विशेष घटक सोलापूर या कार्यालयामार्फत सुरु आहे.

ज्या अर्थी उक्त अधिनियमाच्या कलम २१ नुसार संपादनाचे प्रयोजनामुळे बाधित जमिनी मध्ये हितसंबंध असलेल्या सर्व हितसंबंधित व्यक्तींना त्यांच्या हितसंबंधाचे स्वरुप आणि अशा हितसंबंधाबद्दलच्या नुकसानभरपाई साठी त्यांच्या दाव्यांची रक्कम व त्याचा तपशील आणि जमिनीच्या केलेल्या मोजणीसंबंधी कोणताही आक्षेप असल्यास तो सादर करणेसाठी नोटीस बजाविणे आवश्यक आहे.

या कार्यालयाने,कलम २० अन्वये प्राप्त संयुक्तमोजणी विवरणपत्रानुसार सर्व हितसंबंधितांना उक्त अधिनियमाच्या कलम २१ (१) (४) अन्वयेची नोटीस बजाविलेल्या आहेत. प्रस्तुत नोटीस ज्या हितसंबंधितांना प्राप्त झालेली नाही अशा हितसंबंधितांना व **बाधित जमिनी मध्ये हितसंबंध असलेल्या सर्व हितसंबंधित व्यक्तींना(बाधित क्षेत्रावर हितसंबंध धारण करणा-सह मालक/ भाडेकरु अथवा अन्य मार्गाने हितसंबंध असल्यास) या जाहीर प्रसिध्दीकरणाव्दारे कळविण्यात येते की**

---

ज्या अर्थी समूचित शासन म्हणजेच जिल्हाधिकारी सोलापूर यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(४) सह भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३, चे कलम १९ ची अधिसूचना पुढील प्रमाणे प्रसिध्द केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र शासन राजपत्र | दिनांक : १८/०८/२०१६ |
| २ | दैनिक स्थानिक वृत्तपत्र | |
| | १. दै. संचार | दिनांक : २५/०८/२०१६ |
| | २. दै. सुराज्य | दिनांक : २५/०८/२०१६ |
| ३ | नगरपरिषद बार्शी कार्यालय | दिनांक : २५/०८/२०१६ |
| ४ | समुचित शासनाचे वेब साईटवर | दिनांक : २३/०८/२०१६ |
| ५ | संपादनाअंतर्गत जागेवर | दिनांक : २३/०८/२०१६ |

त्या अर्थी उक्त नमूद घोषणेच्या अनुसूचीमध्ये, अधिसूचित केलेले मौ.बार्शी ता.बार्शी,जिल्हा सोलापूर येथील मिळकत सं..न.६० पै गट न.२४५ पै. मधील क्षेत्र बार्शी शहराच्या मंजूर विकास योजनेतील आ.क्र.३४," बगीचा " ताब्यात घेण्याचे शासनाने ठरविले आहे. या जमिनीमध्ये हितसंबंध असलेल्या हितसंबंधीतांनी नुकसान भरपाईच्या अनुषंगाने त्यांचे म्हणणे मा.जिल्हाधिकारी सोलापूर यांचे वतीने भूमि संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक सोलापूर यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

सबब वर नमूद केल्याप्रमाणे आपण स्वत: अथवा आपण प्राधिकृत केलेली व्यक्ती/वकील यांचे मार्फत समक्ष, भूमि संपादन विशेष अधिकारी,विशेष घटक, सोलापूर यांच्या डॉ.कोटणीस हॉल, पहिला मजला ,पार्क चौक सोलापूर येथील कार्यालयात, हे प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्याचे तारखे पासुन ३० दिवसाचे आत कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून आपले म्हणणे सादर करावे.

आपणास असेही कळविण्यात येते की, वर नमूद जमिनीच्या अनुषंगाने आपले सदर जमीनीत असलेल्या हितसंबंधाचे स्वरुप आणि त्या संबंधातील नुकसानभरपाईवर सांगितल्या जाणा-या दाव्याचा तपशील आणि उक्त अधिनियमाचे कलम २० अनुसार जागेच्या केलेल्या मोजणीबाबत कोणतेही आक्षेप असल्यास ते सादर करावेत.

वर नमूद हरकती अथवा म्हणणे हे लेखी स्वरुपात व आपण अथवा आपण प्राधिकृत केलेल्या व्यक्ती/वकील यांच्या स्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे.

संपादनांतर्गत व ताब्यात घ्यावयाच्या जागेचा तपशिल खालील प्रमाणे आहे

| अ.क्र. | फाईल क्र. | गाव,तालुका व जिल्हा | ग.नं. | मोजणीनुसार संपादनाअंतर्गत क्षेत्र | संपादनाचे प्रयोजन |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | एस.आर.६/१६ | मौजे बार्शी, तालुका-बार्शी जिल्हा-बार्शी | स.न.६०पै . गट न.२४५ पैकी | ५३०१.५०चौ .मी. | बार्शी शहराच्या मंजूर विकास योजनेतील (दु.सु ) आ.क्र.३४, " बगीचा" साठी भूसंपादन |

ठिकाण- सोलापूर

दिनांक- २२/०६/२०१८.

Mandwale. M.D
( मो.बा.मंडवाले )
भूमि संपादन विशेष अधिकारी,
विशेष घटक,सोलापूर.